| | | | |
|---|---|---|---|
| MHWS040003412025 | दाखल तारीख | : | २६/०३/२०२५ |
| | नोंदणी तारीख | : | २६/०३/२०२५ |
| | निकाल तारीख | : | १५/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ०१ वर्ष ०३ म १९ दि |

**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर, जि. वाशिम यांचे न्यायालयात (पिठासिन अधिकारी सुभाष द. तारे) | |
| नि.फौ.ख.कं.७६/२०२५ | निशाणी क्र.३२ |
| गुन्हा नोंद क्र. व पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र.३३८/२०२४ पोलीस ठाणे आसेगांव |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे आसेगांव, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| प्रतिनिधीत्व | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डी. आरु. |
| आरोपी क्र.१ | **वसंता तुकाराम वाणी**,<br>वय:- ४५ वर्षे, धंदा:-शेती/व्यापार, |
| आरोपी क्र.२ | **सुनिता वसंता वाणी**,<br>वय:- ४० वर्षे, धंदा:-शेती, |
| आरोपी क्र.३ | **भाग्यश्री वसंता वाणी**,<br>वय:- १८ वर्षे, धंदा:-घरकाम, |
| आरोपी क्र.४ | **राणी राजु लोणारे**,<br>वय:- २२ वर्षे, धंदा:-घरकाम,<br>सर्व रा.ईचोरी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम |
| प्रतिनिधित्व | वकील श्री. एम. व्ही. येवले |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २६/१२/२०२४ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात दिल्याची तारीख | २९/१२/२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २६/०३/२०२५ |
| आरोपींविरूध्द दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ११/०३/२०२६ |
| पुरावा नोंदविण्यास ठेवलेली प्रथम तारीख | १७/०४/२०२६ |
| निकालाची तारीख | १५/०७/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधित नाही |

## आरोपींबाबत तपशिल

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>आरोपीचे नाव</th><th>अटकेची तारीख</th><th>जामीनावर सोडल्याची तारीख</th><th>दोषारोप ठेवलेले गुन्हे</th><th>निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली</th><th>दिलेली शिक्षा</th><th>फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे संपरिक्षे दरम्यान निरूध्द केलेला कालावधी</th></tr>
<tr><td>१.</td><td>वसंता तुकाराम वाणी</td><td rowspan="4">दिनांक ०३.०१.२५ रोजी समजपत्र व नोटीस दिली.</td><td rowspan="4">दिनांक ११.०३.२६ रोजी</td><td rowspan="4">कलम ११८(१),३५१ (२)(३),३५२ सहकलम ३(५) भा.न्या.सं</td><td rowspan="4">निर्दोष मुक्त</td><td rowspan="4">लागु नाही</td><td rowspan="4">--</td></tr>
<tr><td>२.</td><td>सुनिता वसंता वाणी</td></tr>
<tr><td>३.</td><td>भाग्यश्री वसंता वाणी</td></tr>
<tr><td>४.</td><td>राणी राजु लोणारे</td></tr>
</table>

## भाग 'क'

फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४

अ. साक्षीदारांची यादी

| सा.क्र. | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | देविदास साहेबराव तागडे | २३ | फिर्यादी |
| २. | आनंदाबाई साहेबराव तागडे | २६ | साक्षीदार |
| ३. | साहेबराव काशीराम तागडे | २७ | साक्षीदार |

ब. बचावाचे साक्षीदार – निरंक

क. अभियोगपक्षाच्या/बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी– निरंक

बचावपक्षाने कबुल केलेल्या दस्तांची यादी –

| अ. क्र. | दस्ताचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १ | घटनास्थळ पंचनामा | २८ |
| २ | जप्ती पंचनामा | २९ |
| ३ | वैद्यकीय प्रमाणपत्र | ३० |

# न्यायनिर्णय

(पारित दिनांक १५/०७/२०२६)

१. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीगत अशी की, फिर्यादी हा मौजे खळणा, ता. नेर, जि. यवतामळ येथे वाशिमकर यांच्या शेतात कामाला होता. फिर्यादीचे आई-वडील मौजे इचोरी, ता. मंगरुळपीर येथे राहत असत. दिनांक २६.१२.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचे वडील साहेबराव यांनी फोन करुन फिर्यादीस माहिती दिली की, गावातील वसंता वाणी व त्याच्या घरातील लोकांनी त्यांना मारहाण केली. त्यांनी फिर्यादीस गावी येण्यास सांगितले. त्यावरुन सायंकाळी ५.०० वाजता फिर्यादी हा कासोळा येथे आला असता त्याच्या आई आनंदाबाई व वडील तेथे होते. त्यावेळी त्याच्या आईच्या कपाळाला, डोक्याला मार लागलेला होता व इतर ठिकाणी मुक्का मार लागला होता. त्याने वडिलांना घटनेबाबत विचारले असता त्याच्या वडिलांनी सांगितले की, दिनांक २६.१२.२०२४ रोजी दुपारी १.०० ते १.३० वाजता सुनिता वाणी हिने त्याच्या आई सोबत उकंडयाच्या कारणावरुन वाद केले. त्यानंतर सर्व आरोपींनी कचरा टाकण्याच्या कारणावरुन त्याच्या आईला मारहाण केली, आरोपी राणी हिने त्याच्या आईला लाथाबुक्यांनी मारहाण केली, आरोपी वसंता याने काठीने त्याच्या आईच्या डोक्यावर मारुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीच्या वडिलांनी त्यांना पुढे सांगितले की, भांडणाचा आवाज ऐकुन ते सोडविण्यासाठी गेले असता सर्व आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली, आरोपी वसंता व राणी यांनी जोरजोरात ओरडुन तिला बाहेर काढा, तिच्या गांडीत चटणी भरा, कोण काय करते मी पाहतो अशी धमकी दिली. वसंता वाणी याने भांडणात फिर्यादीच्या वडिलांची गच्ची दाबुन लोटुन दिले व आईवर शिवीगाळ केली. त्या भांडणात फिर्यादीच्या आईची पोत व ५ ग्रॅम सोन्याचे मणि मंगळसूत्र तुटून पडले व गहाळ झाले. घटनेनंतर फिर्यादीचे वडील हे फिर्यादीच्या आईला घेवुन पोलिस ठाण्यात गेले असता पोलिसांनी

कासोळा येथे दवाखान्यात आणले. त्याठिकाणी प्राथमिक उपचार करुन पुढील उपचाराकरीता जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे पाठविले.

२. दिनांक २९.१२.२०२४ रोजी पोलिस ठाणे आसेगांव येथे दिलेल्या रिपोर्टवरुन आरोपींविरुद्ध अपराध क्र.३३८/२०२४ हा भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ सहकलम ३(५) अन्वये नोंद करण्यात आला व सदर गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ. गणेश टि. भोयर ब.क्र.६४१ यांच्याकडे सोपविण्यात आला.

३. तपासीक अंमलदार यांनी तपास पुर्ण करुन आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केल्याबद्दल दोषारोपपत्र पाठविले.

४. आरोपींविरुध्द निशाणी १४ कडे भा.न्या.सं चे कलम ११८(१), ११५(२),३५१(३),३५२ सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप निश्चीत केलेला आहे. त्यांना दोषारोप वाचुन व समजावून सांगण्यात आला. त्यांनी गुन्हा कबुल केला नाही व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने भाग-क मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण ३ साक्षीदार तपासले आहेत. फिर्यादी व साक्षीदार यांनी अभियोगपक्षाचे समर्थन केले नाही. तसेच आरोपींतर्फे जप्ती पंचनामा, घटनास्थळ पंचनामा व जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्र मान्य करण्यात आले आहेत. फिर्यादी व साक्षीदार यांनी अभियोगपक्षास समर्थन न केल्यामुळे अभियोगपक्षाचे इतर साक्षीदार तपासुन कोणताही उपयोग होणार नसल्यामुळे आज रोजीच्या निशाणी क्र.०१ कडील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा दिसून न आल्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ अन्वये आरोपींचे निवेदन वगळण्यात आले.

**६.** सहाय्यक सरकारी विधिज्ञ व आरोपींचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर व उभय वकीलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे उपस्थितीत होतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद केलेल्या कारणांमुळे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक २६.१२.२०२४ रोजी १.०० ते १.३० वाजताच्या सुमारास मौजे ईचोरी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम येथे आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीच्या आईला काठीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व त्याद्वारे भा.न्या.सं. चे कलम ११८(१) सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| २ | उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीच्या आईला लाथाबुक्यांनी आणि फिर्यादीच्या वडिलांची गच्ची दाबुन लोटुन दिले व त्याद्वारे भा.न्या.सं.चे कलम ११५(२) सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ३ | उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या आई-वडिलांनी सार्वजनिक शांततेचा भंग घडवुन आणण्याच्या दृष्टीने त्यांना शिवीगाळ करुन अपमानित केले व त्याद्वारे भा. न्या.सं.चे कलम ३५२ सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ४ | उपरोक्त दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व त्यांच्या आई-वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भा.न्या.सं.चे कलम ३५१(३) सहकलम ३(५) अन्वयेचा गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ५ | काय आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.०१ ते ०४ करीता.**

**७.** वरील सर्व मुद्‌दे एकाच घटनेशी निगडीत असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रितरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

**८.** साक्षीदार क्र.०१ हे फिर्यादी आहेत. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना ही अंदाजे २ वर्षापूर्वी घडली होती. त्यावेळी त्यांचे वडील व आरोपींमध्ये कचरा टाकण्याच्या कारणांवरुन बोलाचाल झाली होती. त्याबाबत त्यांना त्यांच्या वडिलांकडुन समजले होते. त्यामुळे रागाच्या भरात नातेवाईकांच्या सांगण्यावरुन त्यांनी रिपोर्ट दिला होता. त्यांनी रिपोर्टवरील त्यांची सही मान्य केली असली तरी त्यातील मजकूराबाबत अनभिन्नता दर्शविली आहे. फिर्यादी अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकीलांनी त्यांना उलटतपासात विचारण्याचे प्रश्न न्यायालयाच्या परवानगीने विचारले, परंतु त्यातुनही अभियोगपक्षास समर्थनीय अशी कोणतीही बाब आलेली नाही. फिर्यादीने अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे घ टना घडल्याचे नाकारले आहे.

**९.** साक्षीदार क्र.२ ही फिर्यादीची आई आहे व साक्षीदार क्र.३ हे फिर्यादीचे वडील आहे. त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, त्यांची उकंडयावर कचरा टाकण्याच्या कारणावरुन आरोपींसोबत किरकोळ बोलाचाल झाली होती. त्यानंतर त्यांच्या मुलाने रागाच्या भरात रिपोर्ट दिला होता. आरोपींनी त्यांना थापड बुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केल्याची, काठीने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घ

ाडल्याचे त्यांनी नाकारले आहे. साक्षीदार क्र.२ व ३ हे अभियोग पक्षास समर्थन करत नसल्यामुळे सहाययक सरकारी वकिलांनी त्यांना देखील उतटतपासात विचारण्याचे प्रश्न न्यायालयाच्या परवानगीने विचारले, परंतु त्यातुन देखील अभियोग पक्षास समर्थनीय कोणतीही बाब आली नाही. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटना घडल्याचे त्यांनी नाकारले आहे.

१०. आरोपींच्या वतीने घटनास्थळ पंचनामा मान्य करण्यात आला असला तरी, त्यावरुन घटनास्थळाची पंचनाम्यावेळची परिस्थीती दिसुन येते, इतर कोणत्याही बाबींचा बोध होत नाही. आरोपींच्या वतीने जप्ती पंचनामा मान्य करण्यात आला असला तरी, सदर पंचनाम्याअन्वये जप्त करण्यात आलेल्या काठीने त्यांना आरोपींनी मारहाण केल्याचे फिर्यादीने व साक्षीदारांनी स्पष्टपणे नाकारले आहे. आरोपींच्या वतीने जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र मान्य करण्यात आले असले तरी, त्यावरुन साक्षीदार क्र.३ यांना जखमा झाल्या होत्या हिच बाब दिसुन येते. सदरच्या जखमा आरोपींनी मारहाण केल्यामुळे झाल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट, आरोपींनी त्यांना मारहाण केल्याचे फिर्यादीने व साक्षीदारांनी स्पष्टपणे नाकारले आहे. तसेच रिपोर्ट व बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहुन घेतल्याचे देखील साक्षीदारांनी नाकारलेले आहे.

११. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या तोंडी कथनावरुन आरोपींनी विविक्षीत गुन्हे केल्याचे मानता येणार नाही. तक्रारदार व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. तशी तडजोड पुरसीस निशाणी क्र.२२ कडे दाखल केलेली आहे. ***मा. सर्वोच्च न्यायालयाने मदनमोहन अबोट वि. स्टेट ऑफ पंजाब २००८ क्रिमिनल लॉ जर्नल २२४३*** मध्ये असे निष्कर्ष नोंदवला आहे की, गुन्हा हा सार्वजनिक हितसंबंधावर परिणाम करणार नसेल व जो केवळ वैयक्तिक स्वरूपाचा असेल तर न्यायालयाने फिर्यादी व

आरोपींमधील तडजोडपत्र स्विकारावे कारण न्यायालयामध्ये बरेच खटले प्रलंबित आहेत त्या खटल्यांना वेळ देता येईल तसेच तडजोड झालेल्या प्रकरणात अभियोगपक्षाच्या बाजुने निकाल लागण्याची शक्यता नसेल तर तडजोड स्विकारावी असा निष्कर्ष नोंदवला आहे व या प्रकरणाला वरील निष्कर्ष लागु होतो. तसेच प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. तक्रारदार व आरोपी यांनी तडजोड पत्र दाखल केल्यामुळे अभियोगपक्षाचे पुढील साक्षीदार तपासून कोणताही महत्वपूर्ण पुरावा उपलब्ध होणार नसल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे. एकंदरीत अभियोगपक्षाच्या वतीने आलेल्या पुराव्यावरुन आरोपींवरील दोषारोप योग्य शंकेच्या बाहेर जाऊन शाबीत झाले असे म्हणता येणार नाही तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मदनमोहन अबोट मधील न्यायनिर्णयातील सिध्दांतानुसार फिर्यादी व आरोपींमधिल तडजोडपत्र विचारात घेऊन मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.०५ बाबत**

**१२.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ वरील निष्कर्षांमुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत.

**१३.** प्रस्तुत प्रकरणात आरोपी यांच्या ताब्यातून एक बांबुची काठी जप्त केल्याचे अभियोगपक्षाचे कथन आहे. सदर काठी मुल्यहिन असल्यामुळे विल्हेवाटीत करण्याबाबत आदेश करावा लागणार आहे.

**१४.** भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये या न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात आलेल्या अपील किंवा ईतर कार्यवाहीत हजर राहण्याची हमी म्हणून आरोपींना जामीन देण्याकरीता आदेशीत करणे आवश्यक आहे. सबब आदेश–

## आदेश

१. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम २७१ (१) अन्वये आरोपींना भा.न्या.सं.चे कलम ११८(१),११५(२),३५१(३),३५२ सहकलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा पुर्वीचा जामीन कद्बा रद्द करण्यात येतो.

३. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम ४८१ अन्वये आरोपींनी प्रत्येकी रक्कम रूपये ५,०००/- चा जात मुचलका व जामीनकद्बा द्यावा. आरोपींनी दिलेले जात मुचलका व जामीनकद्बा आजपासून पुढे सहा महिन्यांपर्यंत परिणामकारक असेल.

४. जप्त मुद्देमाल एक बांबुची काठी मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर विल्हेवाटीत करावी, परंतु प्रस्तुत न्यायनिर्णयाविरुध्द अपील केले असल्यास त्यातील आदेशान्वये विल्हेवाटीत करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SUBHASH DATTARAO TARE

Digitally signed by SUBHASH DATTARAO TARE
Date: 2026.07.15 15:54:05 +0530

दिनांक :- १५/०७/२०२६

(सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| Name of Court | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | N. F. Syed (Stenographer-III) |
| Date of Judgment | 15.07.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | 15.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | 15.07.2026 |